पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-१०
सभावृत्तांत

दि.- ७/१/२०१५ वेळ -दुपारी १२:०० वाजता

------------------- ---------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय समितीची मासिक सभा बुधवार दि.७/१/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.जम सोनाली पोपट सभापती
२) मा.सावळे सिमा रविंद्र
३) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
४) मा.भोसले राहूल हनुमंतराव
५) मा.पालांडे सुजाता सुनिल
६) मा.सौ.पानसरे अमिना महंमद
७) मा.कदम सदगुरु महादेव
८) मा.गिता सुशिल मंचरकर
९) मा.कैलास महादेव कदम
१०) मा.शितोळे शैलजा महादेव
११) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
१२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१३) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१४) मा.गायकवाड संध्या सुरदास
१५) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१६) मा.शेंडगे आशा सुखदेव
१७) मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.
मा. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी,जावळे- उपअभियंता पापु, श्री.सोनवणे-उपअभियंता,विदयुत, विदयुत,श्री.शिंदे- उपअभियंता, स्थापत्य, श्रीमती अनघा पाठक- उपअभियंता जलनि:स्सारण, श्री.वाईकर- उपअभियंता स्थापत्य , श्री.रमेशकुमार जोशी-लेखाधिकारी,श्री.संजय घुबे-उपअभियंता ,श्री.पोरेड्डी- उपअभियंता, श्री.अकबर शेख- कनिष्ठ अभियंता वि, श्री.रविंद्र भोकरे- सहा.आरोग्याधिकारी, श्री.भोसले - उद्यान निरीक्षक, हे अधिकारी उपस्थित होते.

----

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-१ ) वॉर्ड क्र.४० मधील संत तुकारामनगर येथील संत शिरोमणी सावतामाळी उदयान येथील ट्रान्सफॉर्म्र हलविणेच्या कामास मान्यता देणेबाबत- मा.सदगुरु महादेव कदम,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-२) विठ्ठलनगर येथील जुने संडास ब्लॉक तोडून दुमजली नवीन संडास ब्लॉक बांधणेबाबत-मा.राजेंद्र काटे,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३) नवी सांगवी व सांगवी येथे नांव देणेबाबत-मा.शैलजा शितोळे, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) कै.गोविंद शेट्टी उदयानाचे नाव बदलून कै.हरिश्चंद्र मंचरकर उदयान करण्याबाबत- मा.गिता मंचरकर, मा.राहूल भोसले,मा.सुषमा तनपुरे,मा.शैलजा शितोळे,मा.शकुंतला बनसोडे,मा.किरण मोटे,मा.जितेंद्र ननावरे,मा.आशा शेंडगे,मा.योगेश बहल,मा.सुजाता पालांडे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) नामकरण करणे व फलक लावणेबाबत- मा.आशा शेंडगे,मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) सांगवी येथील विकास आराखडयामध्ये रस्तेबाबत-मा.अतुल शितोळे,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

--------

ठराव क्रमांक - ९८ विषय क्रमांक-१

दिनांक ७/१/२०१५ विभाग-

सुचक-मा. सदगुरु कदम अनुमोदक -मा.राहूल भोसले

संदर्भ - मा.सदगुरु महादेव कदम,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.४० संततुकारामनगर जवळील गंगानगर येथील संत शिरोमणी सावतामाळी उदयानातील ट्रान्सफॉर्मर हलविणे आवश्यक आहे.सदर कामाकरिता अंदाजे र.रु.१०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.सदर कामाची सन २०१४-१५ च्या मंजुर अर्थसंकल्पात तरतुद नसलेने निविदा कार्यवाही प्रलंबीत आहे. सबब सदर कामाची तातडी लक्षात घेता सदर कामास व येणा-या र.रु.१०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ९९ विषय क्रमांक-२

दिनांक ७/१/२०१५ विभाग-

सुचक-मा. राहूल भोसले अनुमोदक -मा.राजेंद्र काटे

संदर्भ - मा.राहुल भोसले, मा.राजेंद्र काटे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विठ्ठलनगर राजीव गांधी माध्यमिक शाळेशेजारी १६ सिटस्चे संडास ब्लॉक आहे सदर संडास ब्लॉक फार जुने झाले असून पुर्णत:मोडकळीस आलेले असलेने कधीही काही दुर्घटना होण्याची शक्यता असलेने सदर ठिकाणचे जुने मोडकळीस आलेले संडास ब्लॉक तोडून त्याठिकाणी नवीन खाली १३ सिटसचे व वर १३ सिटस असे दुमजली संडास ब्लॉक बांधण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - १००　　　　　　　　　　विषय क्रमांक-३

दिनांक ७/१/२०१५　　　　　　　　　　विभाग-

सुचक-मा. शैलजा शितोळे　　　　　　　अनुमोदक -मा.गीता मंचरकर

संदर्भ - मा.शैलजा शितोळे, मा.गीता मंचरकर यांचा प्रस्ताव.

१) नवी सांगवी येथील सर्वे नंबर ७४ मध्ये पूर्व पश्चिम असणारा रोड (ग्रँड मल्हार हॉटेल व सुहासी हॉटेल मधील रस्ता) यांस **"कै.परशुराम ढोरे पथ"** असे नांव देणेस व कमानीसह येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. २) सांगवी दशक्रिया नवीन शेडला "कै.आत्माराम ओंकार ढोरे" दशक्रिया शेड असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक – १०१　　　　　　　　　विषय क्रमांक-४

दिनांक ७/१/२०१५　　　　　　　　　　विभाग-

सुचक-मा. गीता मंचरकर,　　　　　　　अनुमोदक -मा.राहूल भोसले

संदर्भ - मा.गीता मंचरकर, मा.राहूल भोसले, मा.सुषमा तनपुरे,मा.शैलजा शितोळे,मा.शकुंतला बनसोडे,मा.किरण मोटे,मा.जितेंद्र ननावरे,मा.आशा शेंडगे,मा.योगेश बहल,मा.सुजाता पालांडे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव.

यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.४१ गांधीनगर येथील विशाल ई-स्कवेअर सिनेमाच्या मागील बाजुस **"कै.गोविंद शेट्टी उदयान"** आहे.सदर उदयानाचे नांव बदलून **"कै.हरिश्चंद्र मंचरकर उदयान"** असे करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सदगुरु कदम**- मा.सभापती, माजी नगरसेवक सर्वोत्तम शेट्टी यांचे वडिल **"कै.गोविंद शेट्टी उदयान"** असे सदर उदयानास आहे. त्यांनी सामाजिक कार्य केलेले असल्यामुळे सदर उदयानास त्यावेळेस नांव दिलेले आहे. दर ५ वर्षांनी नवीन सदस्य निवडून आल्यानंतर असे नांव बदलणेचा ठराव मंजुर होतील. त्यामुळे सदर ठरावास माझा विरोध नोंदवून घेणेत यावा.

**( मा.सदगुरु कदम यांचा विरोध)**

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

ठराव क्रमांक – १०२ विषय क्रमांक-५

दिनांक ७/१/२०१५ विभाग-

सुचक-मा. आशा शेंडगे अनुमोदक -मा.सुजाता पालांडे

संदर्भ -मा.आशा शेंडगे,मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

कासारवाडी मधील काही भागांना नामकरण करावयाचे आहे व तेथे फलक लावावे.१) " **कै.लक्ष्मणराव लांडगे मळा**" २) "**भैरवनाथ मंदीर**"

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक – १०३ विषय क्रमांक-६

दिनांक ७/१/२०१५ विभाग-

सुचक-मा. अतुल शितोळे अनुमोदक -मा. सदगुरु कदम

संदर्भ -मा. अतुल शितोळे, मा. सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

सांगवी वॉर्ड क्र.५९ मधील मनपा विकास आराखडयामध्ये नमूद केलेले रस्ते रद्द करणेबाबत.

| **अ.क्र.** | **डी.पी.मधील नमूद रस्ता** | **जवळील खूण** |
|---|---|---|
| १ | स.नं.१४ ते २४ पर्यंत ग्रीन प्लेट लगतचा रस्ता | मधुबन कॉलनीमधील १२.०० मी.डी.पी.रस्ता |
| २ | सर्व्हे नं.९ ते १२ (आ.क्र.३२१ ) चे लगतचा ९ मी.रस्ता. | ढोरेनगर मधील ९ मी.नियोजित रसता |

तरी या भागामध्ये उपलब्ध असणारे इतर रस्ते विकसित झाले असल्याने व वरील रस्त्यांची आवश्यकता भासत नाही तरी सदर रस्ते विकास आराखडयापासून रद्द करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(जम सोनाली पोपट)
सभापती
क क्षेत्रीय समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपलिका
क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कक्षेका/कावि/३ /२०१५
दि.  १२ /१/२०१५



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.